# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

**(ISO 9001:2008 प्रमाणित)**

पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

**(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०**

**website : http://www.dteau.org email : roaurangabad@dtemaharashtra.gov.in**


**परिपत्रक/महत्वाचे**

जाक्र/विकाऔ/शिक्षण/२०१८/2308

दिनांक :- 7 JUL 2018

प्रति,

**प्राचार्य,**

सर्व व्यावसायीक अभ्यासक्रमाच्या संस्था,

औरंगाबाद विभाग.

**विषय : शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील प्रवेश प्रक्रियेकरिता कार्यरत सुविधा केंद्र व प्रवेश निश्चिती केंद्रांवर राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना आणि डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजना यांची माहिती प्रसिध्द करण्याबाबत. . . . .**

संदर्भ : मा.संचालक, तंत्रशिक्षा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.२अ/एडीएम/२०१८/७९५अ, दिनांक १५ जुन २०१८

या कार्यालयाच्या अधिनस्त येत असलेल्या शासकीय पदविका/पदवी/पदव्युत्तर पदवी व्यावसायीक अभ्यासक्रमाच्या संस्था प्रमुख यांना सुचित करण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रिया सुरु झाल्या आहेत. या प्रवेश प्रक्रियेसाठी सर्व विभागातील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांना सुविधा केंद्र (Facilitation Center) आणि प्रवेश निश्चिती केंद्र (Admissin Reporting Center) निश्चित करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

शासनाने राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना आणि डॉ. पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजना लागु केलेली आहे. तेंव्हा आपल्या संस्थेतील सुविधा केंद्र आणि प्रवेश निश्चिती केंद्रावर या योजनांची माहिती विद्यार्थी आणि पालकांच्या ठळकपणे निदर्शनास येईल अशा पध्दतीने सोबतचे माहितीपत्रक प्रदर्शित करण्यात यावे. याबाबतच्या सूचना यापूर्वीच देण्यात आल्या आहेत. सदरील सुचनाचे तंतोतंत पालन करुन कार्यपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा.

सोबत : माहितीपत्रकाची प्रत

**(महेश शिवणकर)**

प्र.सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रत : या कार्यालयाचे प्रोग्रामर यांना संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.

सत्यमेव जयते




# महाराष्ट्र शासन
## उच्च व तंत्र शिक्षण विभाग




**नरेंद्र मोदी**
मा. पंतप्रधान

**देवेंद्र फडणवीस**
मा. मुख्यमंत्री

**विनोद तावडे**
मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण

**रवींद्र वायकर**
मा. राज्य मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण

### ➢ राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना-:-

- मान्यता प्राप्त संस्थांमध्ये पात्र व्यावसायिक अभ्यासक्रमात प्रवेश घेणारे आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थी केवळ निधी अभावी व्यावसायिक अभ्यासक्रमांपासून वंचित राहू नयेत म्हणून, एक सामाजिक बांधिलकी व घटनात्मक उत्तरदायित्व म्हणून महाराष्ट्र शासनाचा धोरणात्मक निर्णय.
- शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, दि. ३१ मार्च, २०१८ अन्वये मान्यता प्राप्त व्यावसायिक व उच्च शिक्षण अभ्यासक्रमात शिकणा-या आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना राज्य शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेंतर्गत ज्यांच्या पालकांचे **वार्षिक उत्पन्न रु.८.०० लाखापर्यंत** आहे अशा विद्यार्थ्यांनी व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेतून प्रवेश घेतल्यास त्यांना शैक्षणिक व परीक्षा शुल्काच्या **५० टक्के शिष्यवृत्ती** म्हणून अदा करण्यात येईल.

### ➢ डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना-:-

- शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, दि. २२ फेब्रुवारी, २०१८ अन्वये मान्यता प्राप्त व्यावसायिक व उच्च शिक्षण अभ्यासक्रमात शिकणा-या अल्पभूधारक शेतकरी व नोंदणीकृत मजूर यांच्या महानगरातील संस्थांमध्ये शिक्षण घेणा-या पाल्यांना, **प्रतिवर्ष रु.३०,०००/-** व इतर ठिकाणी शिक्षण घेणा-या पाल्यांना, **प्रतिवर्ष रु.२०,०००/-** इतका वसतिगृह निर्वाह भत्ता जास्तीत जास्त दहा महीन्यांसाठी अनुज्ञेय राहील. तसेच,
- इतर विद्यार्थ्यांच्या कुटूंबाचे (दोन्ही पालकांचे एकत्रित,) **वार्षिक उत्पन्न रु. ६.०० लाखापर्यंत** असल्यास, महानगरातील संस्थांमध्ये शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना **प्रतिवर्ष रु.१०,०००/-** व इतर ठिकाणी शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना, **प्रतिवर्ष रु.८,०००/-** इतका वसतिगृह निर्वाह भत्ता जास्तीत जास्त दहा महीन्यांसाठी अनुज्ञेय राहील.

(वरील दोन्ही योजनांचा लाभ हा कुटुंबातील केवळ दोन अपत्यांपर्यंत मर्यादित राहिल)

(वरील दोन्ही योजनांचा लाभ सुलभ पध्दतीने व तात्काळ अदा करता यावा, याकरिता मंजुर रक्कम विद्यार्थ्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यामध्ये जमा करण्यात येईल.)

❖ टिप :- वरील योजनांचे अर्ज ऑनलाईन पद्धतीने भरावयाचे आहेत. पात्रतेचे निकष व अधिक माहीती तंत्रशिक्षण संचालनालयाचे संकेतस्थळ - www.dtemaharashtra.gov.in वर उपलब्ध आहेत.